**प्रेसनोट दि. २२.०९.२०२१**

लोकसेवक अण्णासो शामराव मलमे वय ५६ वर्ष ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बामणोली ता. मिरज जि. सांगली यांचे विरूध्द लाच स्विकारलेबाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी जमीन खरेदी करीत असले गटाचा गावठान दाखला मिळणेबाबत ग्रामपंचाय कार्यालय बामणोली येथे अर्ज केला होता. सदरचा दाखला देण्यासाठी ग्रामविकास अधिकारी मलमे यांनी तक्रारदार यांचेकडे ६०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२१.०९.२०२१ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दि.२२.०९.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये ग्रामविकास अधिकारी मलमे यांनी गावठान दाखला देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ६०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर ग्रामपंचाय कार्यालय बामणोली या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक अण्णासो शामराव मलमे वय ५६ वर्ष ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बामणोली ता. मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून ६०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले आहे.

लोकसेवक अण्णासो शामराव मलमे वय ५६ वर्ष ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बामणोली ता. मिरज जि. सांगली रा. आदर्श प्लाजा, फ्लॅट नं ०१, किल्ला परिसर, आदर्श शाळेजवळ मिरज ता. मिरज जि.सांगली यांचे विरुध्द एम.आय.डी.सी. कुपवाड पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार संजय कलगुटगी, अविनाश सागर, सलीम मकानदार, संजय संकपाळ, भास्कर भोरे, सिमा माने राधिका माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ★

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.